CMYK

फिलिपाईन्समधील भारतीय समाजाचे सेवा आणि व्यावसायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान - मंत्री जयकुमार रावल >>पान 2

जेजुरी गडावर गुढीपाडव्याचा जल्लोष; खंडोबा देवाची महापूजा आणि गडावर आकर्षक फुलांची सजावट >>पान 3

रमजान ईद पार्श्वभूमीवर मेहकर पोलिसांचा रुट मार्च >>पान 4

**सुविचार**

जे तुम्ही पुस्तकात पाहू शकता ते कधीही स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न करू नका.- अल्बर्ट आइनस्टाइन

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 220 ■ शुक्रवार, दि. 20 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



लग्नाच्या वर्षभरातनंतर कोकण हार्टेड गर्लनं दिली गूड न्यूज; नवऱ्यासोबत घराचे फोटो शेअर करत म्हणाली... आतील पान

# इन्स्टाग्राममधून बाहेर पडा, तुम्ही प्रश्न विचारू नये यासाठी करमणुकीत गुंतवून ठेवलं जात आहे : ठाकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकांनी प्रश्न विचारू नये यासाठी त्यांना सातत्याने करमणुकीत गुंतवून ठेवलं जात आहे, त्यासाठी चित्रपट, आयपीएल आणि इतर अनेक माध्यमांचा वापर केला जात आहे. लोकांनी यामध्ये गुंतून जावं आणि सत्तेला प्रश्न विचारू नये यासाठी ही सोय केली जात असल्याची टीका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. लोकांनी आधी इन्स्टाग्रामधून बाहेर पडावं, रोज महाराष्ट्राचं अस्तित्व मिटवलं जात आहे असंही राज ठाकरे म्हणाले.

राज ठाकरेंच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा २० वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी पार्कवर झालेल्या सभेत राज ठाकरे यांनी सरकारच्या धोरणांवर टीका केली. आपण या ठिकाणी आहोत ते महाराष्ट्रासाठी आहोत. आपल्याला ही सत्ता भविष्यात हाती घ्यायची आहे आणि ती आपण घेणार म्हणजे घेणार, असा विश्वास यावेळी राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

जो इराण इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता, त्या इराणवर हल्ले होताना आपण त्यांना साथ द्यायला हवी होती. आपल्याला इराण तेल रुपयामध्ये देतो. पण खामेनी गेल्यानंतरही आपण आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी एकही निषेधाचं वक्तव्य केलं नाही. इराणने जम्मू काश्मीरच्या मुद्द्यावर आपल्याला पाठिंबा दिला होता, पण आपण तो देश अडचणीत असतानाही त्यांना साथ दिली नाही. याचा भविष्यात आपल्याला त्रास नक्कीच होणार. या देशात काय चाललंय, लोक कुठे निघालेत... कुणाला काही पत्ता नाही.

आपल्याला आज करमणुकीमध्ये गुंतवून ठेवलं आहे. आयपीएल, कुठले तरी पिक्चर आणि इतर माध्यमातून गुंतवून ठेवलं जातंय. त्यामुळे पहिल्यांदा



इन्स्टाग्राममधून बाहेर पडा. तुम्ही गुंतवून राहिला तर सरकारला प्रश्न विचारू नये यासाठी हे सगळं आखलेलं आहे. हे फक्त भारतात नव्हे तर जगभरात सुरू आहे. सर्वसामान्य माणसांनी मोबाईलमध्ये, करमणुकीमध्ये अडकून राहावं, मग कुणीही विचार करणार नाही.

पूर्वी लोक रस्त्यावर यायचे, पण आता मोबाईलवर निषेध व्यक्त केला जात आहे. माध्यमांची वाट लावून टाकली आहे. सरकारला विरोध केला तर जाहिराती बंद करू अशी धमकी दिली जाते. या अशा विचित्र परिस्थितीमध्ये देश अडकला आहे.

या करमणुकीच्या गटारगंगेत वाहत जाऊ नका. आपल्याला तीन ट्रिलियन इकॉनॉमी करणार असं मुख्यमंत्री होतात. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना दोन लाख कोटी रुपये राज्यावर कर्ज होतं. आता राज्यावर ११ लाख कोटी रुपयांचं कर्ज आहे. कुठे चाललोय आपण? असा संतप्त सवाल राज ठाकरेंनी विचारला. आपल्या राज्यात तीन वेळा कर्जमाफी झाली, पण शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्याही आपल्याच राज्यात होतात हे दुर्दैवी असल्याचं राज ठाकरे म्हणाले.

या भाषणादरम्यान राज ठाकरेंनी महाराष्ट्रासाठी योगदान असलेल्या व्यक्तिमत्वांची यादी वाचवून दाखवली. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू महाराज, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक महान लोकांची नावं घेतली. त्याचवेळी त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात ज्यांचा वाटा आहे त्यांचीही यादी वाचून दाखवली. त्यामध्ये बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, वि स पागे, संघाचे हेगडेवार, वि का राजवाडे, बाबासाहेब पुरंदरे, रणजित मेहंदळे यांच्या नावांचा आणि कार्याचा गौरव राज ठाकरे यांनी केला. आपल्याकडे या महान लोकांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात, पण त्यांचे विचार कधीही घेतले जात नाहीत. महाराष्ट्र हा प्रतिमेत अडकल्याची खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली. या आधी संपूर्ण देश महाराष्ट्राकडे पाहायचा, महाराष्ट्र काय नवा विचार देणार ते. पण आज काय झालंय महाराष्ट्राला. आज आम्हाला महाराष्ट्र कसा घडवायचा आहे हेच माहिती नाही. सरकार रोज काही ना काही लादतंय, आपल्याला त्याचा काय फरक पडत नाही.

त्यामुळे भविष्यातील महाराष्ट्र घडवण्यासाठी एक नवीन योजना समोर आणतोय. २००६ साली याच व्यासपीठावर मी महाराष्ट्राचा विकास आराखडा आणेन असं सांगितलं होतं. ती ब्लू प्रिंट मी २०१४ साली आणली. त्यानंतर आजपर्यंत त्या ब्लू प्रिंटमध्ये काय आहे हे कुणीही मला विचारलं नाही.

राज ठाकरेंनी यावेळी नवीन वेबसाईट सुरू करत असल्याचं जाहीर केलं. महाराष्ट्र नेक्स्ट असं त्या वेबसाईटचं नाव आहे. त्यामध्ये मराठी आणि इंग्रजीचा पर्याय देण्यात आला आहे. या वेबसाईटवर एकूण २७ विषय देण्यात आले आहेत. त्यामध्ये शेतीपासून ते आरोग्य व्यवस्था, वाहतूक सुविधा अशा विषयांचा समावेश आहे. लोकांच्या ज्या कल्पना आणि विचार असतील ते सर्व या वेबसाईटवर टाकता येणार आहेत. एक नवा महाराष्ट्र घडवण्यासाठी, राज्याला आकार देण्याचं काम घडवण्यासाठी योगदान द्या असं राज ठाकरे म्हणाले.

## विदेशात पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा विदेशी नागरिकांना एनआयएकडून अटक; परराष्ट्रमंत्रालयानं दिली प्रथमच प्रतिक्रिया

नवी दिल्ली: परराष्ट्र मंत्रालयानं गुरुवारी सांगितलं की, सहा युक्रेनियन नागरिक आणि एका अमेरिकन नागरिकाच्या अटकेनंतर, भारताला संबंधित देशांच्या सरकारकडून राजदूतस्तरीय भेटीची विनंती करण्यात आली आहे. मंत्रालयानं पुढे नमूद केले की, या प्रकरणात अंतर्भूत असलेल्या कायदेशीर गोष्टींची गरज लक्षात घेऊन या विनंतीचा विचार केला जाईल.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, ''या प्रकरणात अनेक गुंतागुंतीचे पैलू आहेत. मंत्रालयाला या परिस्थितीची पूर्ण माहिती आहे. हे एक कायदेशीर प्रकरण आहे. भारत सरकारची संबंधित तपास यंत्रणा सध्या याचा तपास करत आहे''.

सोमवारी, राष्ट्रीय तपास यंत्रणेनं दिल्ली, लखनौ आणि कोलकाता येथील विमानतळांसह विविध ठिकाणांवरून सहा युक्रेनियन नागरिक आणि एका अमेरिकन नागरिकाला अटक केली. हे परदेशी नागरिक भारतातून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना अटक करण्यात आली. त्यानंतर, एका विशेष एनआयए न्यायालयानं या सातही परदेशी नागरिकांना ११ दिवसांच्या कोठडीत पाठवले. या परदेशी नागरिकांनी व्हिसा मिळवून भारतात प्रवेश केला. त्यानंतर ते मिझोरममध्ये शिरल्याचा आरोप आहे. तिथून त्यांनी म्यानमारमध्ये प्रवेश करत एका वांशिक सशस्त्र गटाशी संपर्क साधला. या प्रकरणाचा





तपास करणाऱ्या दहशतवादविरोधी यंत्रणेनं सांगितले की, आरोपींनी युरोपमधून भारतामार्गे ड्रोनचा एक मोठा साठा आयात केला होता. हा साठा म्यानमारमधील वांशिक सशस्त्र गटांच्या वापरासाठी होता. विशेष म्हणजे, या गटांचे ईशान्य भारतात कार्यरत असलेल्या बंडखोर गटांशी संबंध असल्याचं मानलं जात आहे.

संरक्षित क्षेत्रांमध्ये हालचालींवर निर्बंध असतात

विशेषतः मिझोरमला भेट देणाऱ्या परदेशी नागरिकांकडे संरक्षित क्षेत्र परवाना असणे आवश्यक असतो. यावर जयस्वाल यांनी सांगितलं की, ''या प्रकरणाचा तपास करणाऱ्या यंत्रणा आणि न्यायालयांद्वारे, त्यांनी असा परवाना मिळवला होता की नाही, हे तपासलं जाणार आहे''. पुढे जयस्वाल म्हणाले, ''संरक्षित क्षेत्रांमध्ये हालचालींवर निर्बंध असतात. त्यांच्याकडे या संदर्भात कोणतेही विशिष्ट कागदपत्र होते की नाही, याची पडताळणी न्यायालय करेल. त्या प्रदेशांमध्ये प्रवास करण्यासाठी त्यांना अशा कागदपत्रांची आवश्यकता नक्कीच भासली असती, हे मात्र नक्की आहे.

पश्चिम आशियातील सध्याच्या संघर्षावर रणधीर जयस्वाल यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ''भारतानं शत्रुत्व कमी करण्याचे आणि तणाव निवळण्याचे आवाहन केलं आहे. पश्चिम आशियातील संकटाच्या संदर्भात आम्ही संयम राखण्याचं आणि तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी पुढे सांगितलं की, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी संयुक्त अरब अमिराती मधील आपल्या समकक्षाशी, तसेच देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांसह इतर परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा केली आहे

पुढे जयस्वाल म्हणाले, युद्ध लवकर संपावे, या आवाहनाचा आम्ही पुनरुच्चार करतो. किंबहुना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिस्थितीच्या संदर्भात ओमानच्या सुलतानांशी चर्चा केली आहे. तेल प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ले अत्यंत चिंताजनक आहेत. तुम्हाला कल्पनाच असेल की, ऊर्जेच्या वाहतुकीचे सागरी मार्ग यामुळे प्रभावित झाले आहेत. येथे भारतात, पेट्रोलियम मंत्रालय या विषयावर दररोज पत्रकार परिषदा घेत आहे''.

त्यांनी असेही नमूद केले की, ''एलपीजीचा () पुरवठा ही अजूनही चिंतेची बाब झालेली आहे. परिणामी, आम्ही देशांतर्गत वापर आणि देशांतर्गत ग्राहकांना सर्वप्रथम प्राधान्य देत आहोत. त्यांच्या गरजांची पूर्ण काळजी घेतली जाईल. त्यानंतर, व्यावसायिक आस्थापनांसाठी एलपीजीचा पुरवठा कसा हाताळायचा, हे आम्ही निश्चित करणार आहोत. भारत रशियाकडूनही एलपीजीची खरेदी करणार आहे'', अशीही त्यांनी माहिती दिली.

## साई बाबांच्या दर्शनसाठी रांगेत थांबलेल्या महिलेला तिचे आक्षेपार्ह फोटो दाखवले; कॅप्टन अशोक खरात प्रकरणात दुसरी मोठी अटक

**मुंबई/प्रतिनिधी :** कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरातच्या किळसवाण्या प्रकारांची धक्कादायक कृत्यांची मालिका उघड झाल्यांनतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. कॅप्टन अशोक खरात प्रकरणात दुसरी मोठी अटक करण्यात आली आहे. या व्यक्ती दुसरा तिसरा कोणी नसून अशोक खरात सोबत काम करणारा आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव नीरज जाधव असे आहे. साई बाबांच्या दर्शनसाठी रांगेत थांबलेल्या महिलेला त्याने तिचे आक्षेपार्ह फोटो दाखवले. यामुळे महिलेला मोठा धक्का बसला.

कॅप्टन खरातच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यावर शिर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. एका महिलेचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल केल्या प्रकरणी १८ फेब्रुवारीला हा गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे. हा कर्माचारी नीरज जाधव आहे. नीरज जाधवने पिडीत म हिलेचे आक्षेपार्ह मोर्फ व्हिडीओचे स्क्रीनशॉट पाठवले होते. अील व्हिडीओचे स्क्रीनशॉट पाहून महिलेला धक्का बसला होता. विशेष म्हणजे जेव्हा ही म हिला शिर्डीत साई बाबांच्या दर्शनासाठी गेली होती. दर्शनाच्या रांगेत ती उभी होती. यावेळी नीजर जाधव आला आणि त्याने खिशातून मोबाईल काढला. नीरज याच्या मोबाईलमध्ये महिलेने तिचे आक्षेपार्ह फोटो पाठवले. हे फोटो पाहून महिलेला मोठा धक्का बसला. ती पुन्हा कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरातकडे आणि पुन्हा त्याच्या जाळ्यात अडकली. या प्रकरणाचा तपासही घ्इए तेजस्वीनी सातपुतेंच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या एघ्ऊ कडून केला जाणार. मुख्यमंर्त्यांनी भोंदू अशोक खरातप्रकरणी २ आठवड्यांपूर्वीच कारवाईचे आदेश दिले होते. खरातला थांगपत्ता लागू न देता पुरावे गोळा करत, पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. फडणवीसांच्या हस्तक्षेपामुळेच खरातची चहुबाजूंनी कोंडी झाली.स्वघोषित कॅप्टन अशोक खरातच्या मिरगावमधील फार्म हाऊसवर रात्री उशिरा क्राईम ब्रँचने छापा टाकला. खरातच्या मिरगाव मधीलफार्म हाऊसम धून महत्त्वाचे दस्तावेज पोलिसांच्या हाती लागले आहेत. खरातच्या मालमत्ता आणि अन्य काही महत्त्वाचे कागदपत्र पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. तर खरातच्या फॉर्म हाऊसमधून एक पिस्तूल देखील पोलिसांनी जप्त केले आहे. एक पिस्तूल आणि काही वापरलेले तर काही न वापरलेले काडतूस देखील पोलिसांना सापडले आहे.

पॅट्रोल महागला





## गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० मुळे राज्यात जंलसाठा क्षमतेत वाढ

दैनिक आपला विदर्भ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील उपक्रमाची फलश्रुती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील जलसुरक्षा बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार उपक्रमाला राज्यभरात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमुळे हजारो जलसाठ्यांची क्षमता वाढली आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० अंतर्गत मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील सुमारे ३,२६८ जलसाठ्यांमधून आतापर्यंत ७.७३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ७७ लाख पाण्याच्या टँकर इतकी जलसाठवण क्षमता पुनर्संचयित झाली असून ११ हजार ५८३ गावांतील सुमारे १ कोटी ३९ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. सुमारे ६९ हजार शेतकऱ्यांनी गाळ आपल्या शेतात नेला, त्यापैकी ९१ टक्के शेतकरी वंचित घटकांतील आहेत.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात योजनेला अधिक गती मिळाली असून १,३९८ जलसाठ्यांमधून २.६९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. यामुळे जवळपास २६ हजार शेतकऱ्यांना फायदा झाला. भंडारा आणि जळगाव जिल्ह्यांत अनुक्रमे ३२ लाख आणि १६ लाख घनमीटर गाळ मंजूर करण्यात आला असून मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३०० टक्के वाढ झाली आहे.

तसेच गोंदिया आणि गडचिरोलीसारख्या आदिवासी जिल्ह्यांतही योजनेच्या कामांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यभरातील ४०० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक समुदायाच्या सहभागातून ही योजना राबविण्यात येत असून जलसाठे पुनरुज्जीवित करण्यास मदत होत आहे.

राज्यातील बहुतांश शेती पावसावर



अवलंबून असल्याने जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण मजबूत करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसुरक्षा बळकट करण्यासाठी या उपक्रमाची अंमलबजावणी शासनाकडून पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.

CMYK

## पाच राज्यांच्या निवडणूका : हिंदूंनी जागे व्हावे...

आगामी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, काही राजकीय पक्षांचा मतपेढीच्या राजकारणाचा विकृत आणि तितकाच लाचार चेहरा समोर आला. विशेषतः मुस्लीम मतांसाठी पराकोटीचे लांगूलचालन, तत्त्वांची गल्लत आणि सांस्कृतिक विकृतीकरण, यामुळे राजकारणाची दिशा नेमकी कुठे चालली आहे, हाच मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. राजकारणात मतांसाठी विविध समाजघटकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न नवे नाहीत. मात्र, जेव्हा या प्रयत्नांमध्ये ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक सत्यांचा विपर्यास केला जातो, तेव्हा त्याचे परिणाम दूरगामी ठरतात. तामिळनाडू आणि केरळमधील अलीकडील घडामोडी हेच दाखवतात. तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्रीपुत्र आणि सनातनद्वेष्ट्या उदयनिधी स्टॅलिनने दावा केला की, ‘द्रविडियन तत्त्वज्ञान आणि इस्लाम यांची तत्त्वे समान आहेत’. पण, स्टॅलिनच्या या विधानाकडे फक्त राजकीय विधान म्हणून दुर्लक्ष न करता, हे समजून घेतले पाहिजे की, हे तत्त्वज्ञानाच्या मूलभूत आकलनालाच आव्हान देणारे उफराटे वक्तव्य आहे. गेल्या वर्षी जगातील सर्वांत प्राचीन सनातन धर्माची तुलना डेंग्यू-मलेरियाशी करून त्याला नष्ट करण्याची भाषा वापरणारा हाच वाचाळ नेता, आज मुस्लीम मतपेढीला खूश करण्यासाठी ‘द्रविडी’ संस्कृतीलाही इस्लामशी जोडण्याचा प्रयत्न करतो, बुद्धिभ्रम पसरवतो, ही विसंगती लांगूलचालन कोणत्या पातळीवर घसरले आहे, हे दर्शवणारी आहे. द्रविडी तत्त्वज्ञान आणि इस्लाम या दोन पूर्णपणे वेगळ्या विचारप्रणाली. इस्लाम हा एकेश्वरवादी धर्म, ज्याचा केंद्रबिंदू अल्ला आणि ‘शरीयत’ या धार्मिक चौकटीत आहे. त्याउलट, द्रविडी तत्त्वज्ञान हे तार्किक, मानवतावादी आणि स्थानिक सांस्कृतिक अभिमानावर आधारित आहे. ते बहुतेक वेळा नास्तिकतेकडे झुकणारे आणि सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे मानले जाते. त्यामुळे एकीकडे धार्मिक अधिष्ठानावर आधारित जीवनपद्धती, तर दुसरीकडे सामाजिक न्याय आणि जातविरोधी विचारसरणी या दोन प्रवाहांची सरमिसळ करणे, हे बौद्धिक प्रामाणिकतेलाच हरताळ फासणारे म्हणावे लागेल. हेच नाही, तर तामिळनाडूमध्ये गेल्या काही वर्षांत घेतलेले निर्णय मुस्लीम अनुनयाचीच राजनीती स्पष्ट करणारे आहेत. कोईम्बतूरमध्ये तिसरे ‘वक्फ’ न्यायालय स्थापन करणे, उलेमांच्या पेन्शनमध्ये वाढ, त्यांना आर्थिक मदत, कब्रस्तानांसाठी जागा देणे, उर्दू शिक्षकांच्या जागा भरणे या सर्व निर्णयांचा एकत्रित विचार केला, तर विशिष्ट मतपेढीला खिशात घालण्याचा प्रयत्न अगदी स्पष्ट दिसतो. याशिवाय, ‘तिहेरी तलाक’ विधेयकाला विरोध करणेही त्याच राजकीय गणिताचा भाग होता. हे करताना हिंदू समाजाच्या भावनांकडे मात्र वारंवार दुर्लक्ष केल्याची उदाहरणेही आहेत. तिरुपरंकुंद्रम टेकडीवरील दीपथूनवर ‘कार्तिगाई दीपम’ प्रकरणासारख्या घटनांमध्ये धार्मिक परंपरांना कमी लेखले गेले. परिणामी, समतेच्या नावाखाली प्रत्यक्षात असंतुलन निर्माण होत असल्याची भावना समाजात वाढीस लागली आहे.केरळमधील परिस्थितीही फार वेगळी नाही. किंबहुना, काही बाबतीत तर ती अधिक चिंताजनक. शाळा-मदरशांच्या पुस्तकांमध्ये ‘हमास’सारख्या संघटनेच्या संस्थापकाचा चक्क ‘पुनर्जागरण नेता’ म्हणून उल्लेख केल्याची धक्कादायक बाब समोर आली. कोणत्याही प्रकारच्या दहशतवादी विचारसरणीला अप्रत्यक्ष वैधता देणारे, असे चित्रण शिक्षण व्यवस्थेसाठी धोकादायकच. केरळमध्ये डाव्या विचारसरणीचे सरकार सत्तेत असले, तरी ‘अल्पसंख्याकांचे संरक्षण’ या नावाखाली विशिष्ट समाजघटकांचे अनुनय करण्याची प्रवृत्ती दिसते. ‘सीएए’विरोधातील भूमिका, केंद्र सरकारवर मुस्लिमांना दुय्यम नागरिक ठरवल्याचा आरोप या सर्व बाबी एकाच राजकीय रेषेत बसतात. याच पार्श्वभूमीवर केरळमध्ये ‘पीएफआय’, ‘एसएफआय’ आणि ‘इसिस’सारख्या दहशतवादी संघटनांचे जाळे कसे फोफावले, हा प्रश्नही दुर्लक्षित करता येत नाही. काही वर्षांत अनेक तरुणांच्या कट्टरतेकडे झुकण्याच्या घटना समोर आल्या. यामागे सामाजिक, आर्थिक कारणे असली, तरी राजकीय वातावरणाने त्याला खतपाणी घातले का, याचा विचार आवश्यक आहे. नुकत्याच गाजलेल्या मोनालिसा विवाह प्रकरणासारख्या घटनांमध्येही डाव्या नेत्यांची प्रकर्षाने दिसून आलेली उपस्थितीही अनेक प्रश्न निर्माण करते. तसेच समाजातील एका विशिष्ट प्रवाहाला वारंवार राजकीय पाठबळ दिले जाते, जेणेकरुन निवडणुकीत ही मतपेढी भक्कमपणे पाठिशी उभी राहील. लोकसंख्येच्या आकडेवारीकडे पाहिले, तर केरळमध्ये २०११च्या जनगणनेनुसार मुस्लीम लोकसंख्या २६.५६ टक्के आणि तामिळनाडूमध्ये ती ५.८६ टक्के असली, तरी काही जिल्ह्यांमध्ये ती लक्षणीय आहे. केरळ आणि तामिळनाडूतील मतदारसंघांची आकडेवारी पाहिली, तरी मुस्लीम मतांचे राजकीय महत्त्व किती निर्णायक ठरते, हे स्पष्ट होते. केरळमध्ये सुमारे २६ टक्के असलेली मुस्लीम लोकसंख्या मलबार पट्ट्यात ४० ते ७० टक्क्यांपर्यंत पोहोचते आणि त्यामुळे मंजेश्वरम, कासरगोड, मलप्पुरम, तिरूर, वेंगरा यांसारख्या ३५ ते ४५ मतदारसंघांमध्ये विजयाची किल्ली प्रत्यक्षात मुस्लीम मतदारांच्या हातात असते. म्हणूनच, ‘इंडियन युनियन मुस्लीम लीग’सारख्या पक्षांना ‘किंगमेकर’ची भूमिका प्राप्त होते आणि सत्तेच्या समीकरणात त्यांचा प्रभाव असमप्रमाणात वाढतो. तामिळनाडूमध्येही मुस्लीम लोकसंख्या केवळ सुमारे ५.८६ टक्के असली, तरी वेल्लोर-अंबूर-वाणीअंबाडी पट्टा, रामनाथपुरम परिसर किंवा चेन्नईतील काही शहरी मतदारसंघांमध्ये १० ते १५ टक्क्यांपर्यंत पोहोचणारे एकसंध मतदान अनेक ठिकाणी निकालाची दिशा बदलण्याची क्षमता ठेवते. विशेषतः बहुकोनी लढतीत ही एकगठ्ठा मते निर्णायक ठरतात आणि त्यामुळे सुमारे २० ते २५ मतदारसंघांमध्ये मुस्लीम मत हे थेट किंवा अप्रत्यक्षपणे सत्ता ठरवणारे घटक बनते. याच वास्तवातून राजकीय पक्षांची रणनीती आकार घेते. केरळमध्ये थेट अनुनय आणि तामिळनाडूमध्ये आघाडीची समीकरणे आणि परिणामी, तत्त्वनिष्ठ राजकारणापेक्षा मतपेढीचे गणित वरचढ ठरते. कर्नाटकातील विधानसभेत निवडणुकीत ही एकगठ्ठा मुस्लीम मतेच भाजपला सत्तेपासून दूर ठेवणारी ठरली आणि ६५ जागांवर भाजपचा निसटता पराभव झाला, हे येथे लक्षात घ्यायला हवे. तामिळनाडू आणि केरळमधील उदाहरणे हेच दर्शवितात की, ‘सेक्युलर’ या गोंडस संकल्पनेखाली प्रत्यक्षात निवडक समाजघटकांना खूश करण्याचेच बोटचेपे धोरण राबविले जाते. त्यात कधी तत्त्वज्ञानांची गल्लत केली जाते, तर कधी शिक्षण व्यवस्थेतून विशिष्ट विचारांना प्रोत्साहन दिले जाते. याचा सर्वात मोठा धोका म्हणजे, समाजातील संतुलन बिघडणे. एका समाजघटकाला विशेष वागणूक मिळते, अशी भावना निर्माण झाली, तर इतरांमध्ये असंतोष वाढतो. दीर्घकाळात हे सामाजिक तणावाचे कारण ठरू शकते. राजकारणाने समाजाला दिशा द्यावी, समाजातील मतभेद कमी करावेत, अशी अपेक्षा असते. पण, निवडणुकीच्या तोंडावर मतदान पदरात पाडण्यासाठी राजकारणच असे मतभेद वाढवणारे ठरले, तर लोकशाहीच्या निरोगी आरोग्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. तेव्हा, मतदारांनीही अशा हिंदूविरोधी नेत्यांच्या भूमिकांकडे, विधानांकडे बारकाईने लक्ष ठेवून, त्यामागील छुपा अजेंडा समजून घ्यायला हवा. बंगालमध्ये तर दीदींनी हिंदूंना एका सेकंदात संपविले जाईल, अशी दर्पोक्ती केली. आता तामिळनाडू आणि केरळमध्येही हिंदूंना गृहित धरुन, अल्पसंख्यांकांना भुरळ पाडण्याचे पद्धतशीर उद्योग पुन्हा सुरु झाले आहेत. तेव्हा, आगामी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत हिंदूंनीही सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून मतदान केले, तरच अशा धर्मांध शक्तींना सत्तेपासून दूर ठेवता येईल!

# फिलिपाईन्समधील भारतीय समाजाचे सेवा आणि व्यावसायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान - मंत्री जयकुमार रावल

## मनिला येथे मंत्री रावल यांचा मराठी बांधवांशी संवाद



**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी समाज जगभर पसरलेला असला तरी मातृभूमीशी त्यांचे नाते अतूट आहे. फिलिपाईन्समधील भारतीय समाज संख्येने मर्यादित असला तरी व्यापार, उद्योग, सेवा आणि व्यावसायिक क्षेत्रात त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी मनिला येथे केले.

मंत्री रावल यांनी मनिला येथे आयोजित विशेष कार्यक्रमात भारतीय तसेच मराठी बांधवांशी संवाद साधला. या कार्यक्रमात प्रवासी मराठी समाजाशी संबंध अधिक दृढ करण्यावर भर देत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून प्रवासी मराठी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या १२ कलमी उपक्रमांची घोषणा केली. त्यामध्ये जागतिक महाराष्ट्र मंडळांचा डेटाबेस तयार करणे, अधिकृत ई-मेल प्रणालीद्वारे संपर्क, डिजिटल माध्यमातून जागतिक महाराष्ट्र दिन साजरा करणे, जागतिक प्रवासी महाराष्ट्र मंडळ स्थापन करणे, स्वतंत्र लोगो व संकेतस्थळ विकसित करणे, डिजिटल नोंदणी पोर्टल सुरू करणे, आभासी संवाद सत्रे आयोजित करणे, गुंतवणूक, विद्यार्थी व सांस्कृतिक विषयांसाठी सिंगल विंडो प्रणाली, एमआयडीसी समन्वय यंत्रणा, तक्रार निवारण यंत्रणा, परराष्ट्र मंत्रालय व भारतीय दूतावासांच्या सहकार्याने विद्यार्थी उपक्रम आणि प्रभावी घोषवाक्य तयार करणे यांचा समावेश आहे.

यावेळी मंत्री रावल यांनी महाराष्ट्र आणि जागतिक मराठी समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याची गरज व्यक्त केली. मंत्री रावल म्हणाले की, मनिला, सेबू आणि दावाओ या शहरांमध्ये भारतीय वंशाचे नागरिक आयटी, बीपीओ, आरोग्य व वित्तीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. महाराष्ट्रीयन समाजानेही आयटी, औषधनिर्मिती, सल्लागार सेवा आणि उद्योजकता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारत-फिलिपाईन्स संबंध अधिक बळकट होत असून माहिती तंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था, अक्षय ऊर्जा, संरक्षण सहकार्य आणि प्रक्रिया उद्योग या क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. महाराष्ट्र हे औद्योगिक व वित्तीयदृष्ट्या अग्रगण्य राज्य असून फिलिपाईन्सला आसियान प्रदेशाचे प्रवेशद्वार मानून सहकार्य वाढविण्याची आवश्यकता असल्याचेही मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

नागपूरचे मूळ रहिवासी नरेंद्र सिंगरू व रमोलाआईक सिंगरू यांनी त्यांच्या निवासस्थानी मंत्री रावल यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. त्याचबरोबर मनिलातील मराठी बांधवांनाही आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी भारताचे मनिलातील राजदूत हर्ष कुमार जैन, प्रथम सचिव निलेश कुमार राय उपस्थित होते. आशियाई विकास बँकेचे अधिकारी एल. सत्यश्रीनिवास, अर्जुन सिंह, क्रिशन रोतेला तसेच राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले. कार्यक्रमास मनिलातील मराठी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र शासन प्रवासी मराठी समाजाला राज्याच्या विकासातील महत्त्वाचा भागीदार मानत असून व्यापार, गुंतवणूक आणि सांस्कृतिक संबंध अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मंत्री रावल यांनी केले. तसेच त्यांनी उपस्थितांना आणि मनिलातील सर्व मराठी बांधवांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

## लग्नाच्या वर्षभरातनंतर कोकण हार्टेड गर्लनं दिली गूड न्यूज; नवऱ्यासोबत घराचे फोटो शेअर करत म्हणाली...



आपल्या हक्काचं स्वप्नातलं घर असावं, ही प्रत्येकाचीच इच्छा असते. अनेकजण पै पै साठवून आपसं स्वप्न पूर्ण करतात. सर्वसामान्यांप्रमाणेच अनेक सेलिब्रिटी आहेत, ज्यांचं मुंबईत हक्काचं घर घेण्याचं स्वप्न असतं. अनेकांनी ते स्वप्न पूर्णही केलंय. अशातच आता गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर एका सेलिब्रिटी कपलनं आपल्या स्वप्नातलं घर घेतलं आहे.

प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर कोकण हार्टेड गर्ल अंकिता वालावलकरनं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करुन गुडन्यूज दिली आहे. अंकिता वालावलकर आणि तिचा पती संगीतकार कुणाल भगत यांनी आपल्या हक्काचं घर घेतलं आहे. सोशल मीडियावर घराचे फोटो शेअर करुन अंकिता आणि कुणालनं ही गूड न्यूज चाहत्यांना दिली आहे. पण, त्याहीपेक्षा अंकितानं लिहिलेल्या कॅप्शननं सर्वांचं लक्ष वेधलं आहे.

अंकिता वालावलकरनं पोस्ट शेअर करताना एक कॅप्शन लिहिलंय, ती म्हणालीय की, ''घर घेणं हे फक्त स्वप्न नव्हतं, ती माझी जिद्द होती. मुंबईत आले तेव्हा सिव्हिल इंजिनियर म्हणून इतरांची घरं बांधत होतेपण मनात एकच विचार ''माझं घर कधी?''मी कुठेतरी वाचलं होतं स्वप्नं नेहमी आपल्या लायकीपेक्षा मोठी बघायची.कारण लायकी आपण वाढवू शकतो''

''पण छोटं स्वप्न मोठं होत नाही.मला फॉलो करणाऱ्यांना माहिती असेल.मी कित्येकदा पेडर रोडवरून फेऱ्या मारायचे.अंबानींच्या समोर उभी राहायचे.त्या उंच इमारतीकडे बघायचे,आणि स्टोरी टाकायचे ''एक दिन मेरा भी घर होगा.''लोकांसाठी ती फक्त एक स्टोरी होती पण माझ्यासाठी ती प्रार्थना होती. विश्वाला केलेली एक शांत हाक होती.आज विचार केला तर अंगावर शहारे येतात. आणि योगायोग बघा आज ज्या टॉवरमध्ये आमचं घर आहे, त्या टॉवरचं नाव आहे '''' हा योगायोग आहे? की स्वामींची इच्छा?'', असं अंकिता वालावलकर म्हणाली आहे.

पुढे बोलताना अंकिता वालावलकर म्हणाली आहे की, ''मी जिथे नोकरी करायचे तिथले आमचे कॉंट्रॅक्टर पटेल गुजरातीमध्ये म्हणायचे, '' , ...'' रोटी कमवणं सोपं आहे पण मुंबईत स्वतःचं घर? खूप अवघड. त्या वाक्याने पण मी कधी घाबरले नाही उलट ठरवलं होतं... एक दिवस मीच माझ्या घराच्या चाव्या हातात घेणार!'' ''लग्नानंतर हे ''माझं'' स्वप्न ''आमचं'' झालं. कारण आता घर फक्त चार भिंती नव्हत्या,ते आमचं होतं आमची सुरक्षितता होती.वर्षभर आम्ही घरांच्या शोधात भटकलो.प्रत्येक घरात गेलो पण मन म्हणायचं ''नाही अजून नाही.'' एक वेळ अशी आली की, स्वप्न थोडंसं शांत झालं. ''कदाचित अजून वेळ आहे'', असं आम्ही स्वतःलाच समजावलं.आणि मगअचानक हे घर समोर आलं.दरवाजा उघडलाआणि मन म्हणालं ''हेच!'''', असं अंकिता वालावलकर म्हणाली. ''पण आकडेमोड तयार नव्हती.मन धजावत नव्हतं.भविष्याचं ओझं जड वाटत होतं.मी कुणालचा हात पकडलाआणि हसत म्हटलं ''उडी मारली की पोहायला येतंच.'' त्यादिवशी रात्रभर आम्हाला झोप लागली नाही ,खूप भीती वाटत होतीकुणाल ला तर खूप जास्त भीती वाटत होतीपण मला स्वप्नावर विश्वास होता.आणि त्या दिवशी आम्ही निर्णय घेतला भीतीपेक्षा मोठं आपलं स्वप्न आहे. घ्यायची हिंमत असेल,तरच मोठं स्वप्न पूर्ण होतं. आज या चाव्या हातात आहेत आणि मनात एकच भावना'', असं अंकिता वालावलकर म्हणाली आहे.

# .... आणि ती भुर्रर्र उडून गेली...!



चिमणी म्हणजेच चिऊताई हिची ओळख पूर्वी बालपणात होत होती. म्हणजे लहान बाळाला भरविताना 'हा घास चिऊचा, हा घास काऊचा,' असे म्हणत. खरोखरच मऊ भाताचा एक घास चिमणीला टाकला जात होता व तीही न घाबरता अगदी जवळ येऊन ते अन्न टिपायची. तिच्या त्या सुंदर हालचाली व मंजुळ चिवचिवाट ऐकत बाळाला भरवणे पूर्ण व्हायचे आणि बालपण समृद्ध व्हायचे; पण आता बघता-बघता विकासाच्या झंझावातात ही चिऊताई आपल्यापासून दूर उडून गेली आहे.

आजकाल पालक लहान बाळाला भरविताना मोबाइलवर अँग्री बर्ड दाखवतात आणि मोठ्या अभिमानाने सांगतात की, हा मोबाइलशिवाय जेवतच नाही. येथून त्या बाळाची आणि मोबाइलची घातक मैत्री होऊन भविष्यातील दुष्टचक्र सुरू होते. त्यासाठी हे थांबविणे गरजेचे आहे.

चिमणी हा आपल्या घराजवळ सहज दिसणारा लहान पक्षी आहे, तिचा चिवचिवाट वातावरणात आनंद निर्माण करतो; परंतु गेल्या काही वर्षांत चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे, चिमणी सहसा माणसांच्या वस्तीजवळ राहणे पसंत करते. घरांच्या छपरात, भिंतींच्या फटीत किंवा कौलांखाली ती आपले घरटे बांधत असे. पण आजकाल मातीची घरे राहिली नाहीत. तसेच पूर्वी आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे घरे एकाच झटक्यात पूर्ण बांधली जात नव्हती; ती टप्याटप्प्याने बांधली जात होती. अनेक घरांना बाहेरून प्लास्टर होत नसे. भिंतीच्या विटांमध्ये बांबू बांधण्यासाठी ज्या खोबण्या असायच्या, त्यांत चिमणी हमखास घरटे बांधायची. याशिवाय पूर्वी घरातील गरम हवा बाहेर जाण्यासाठी खिडक्यांच्या वर किंवा स्लॅबखाली छोट्या खिडक्या असायच्या. त्या नेहमी उघड्या असायच्या. त्यामधून चिमणी हक्काने घरात येऊन पंख्यावर, ट्युबलाइटवर किंवा कोनाड्यात आपला संसार थाटायची. पण आता आर्थिक सुबत्ता आली आणि घरे एकाच दमात पूर्ण व्हायला लागली. एसी आल्यामुळे छोट्या खिडक्यांची जागा स्लाइडिंग विंडोंने घेतली आणि चिमणीसाठी आपल्या घरात व मनात जागाच राहिली नाही.

चिमण्या धान्याचे दाणे, किडे-मुंग्या आणि छोटे कीटक खातात, त्यामुळे त्या शेतीसाठी खूप उपयुक्त ठरतात. चिमण्यांचे निसर्गात मोठे महत्त्व आहे. त्या कीटक खाऊन पिकांचे संरक्षण करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत होते. तसेच त्या बियाणे पसरवून नवीन झाडे उगवण्यास मदत करतात. चिमण्यांच्या चिवचिवाटामुळे परिसर आनंदी व जिवंत वाटतो. चीनमध्ये एकदा चिमण्यांबावत घडलेली घटना याचे महत्त्व दाखवून देते. तेथे चिमण्या धान्य खातात म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणावर नाश करण्यात आला; परंतु त्यानंतर शेतातील किड्यांची संख्या प्रचंड वाढली आणि पिकांचे मोठे नुकसान झाले. चीनमध्ये अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. नंतर संशोधनातून चिमणीचे महत्त्व लक्षात आल्यावर दुसऱ्या देशातून चिमण्यांची आयात करून त्यांचे संवर्धन केले गेले. चिमणीमुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते. म्हणूनच चिमणी हा निसर्गातील अन्नसाखळीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

निसर्गातील प्रत्येक जिवाचे महत्त्व अनन्यसाधारण असते, हे लोकांच्या लक्षात आले पाहिजे. निसर्गातील संतुलन टिकवण्यासाठी प्रत्येक जीव आवश्यक असतो. त्यामुळे चिमण्यांचे संवर्धन करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी आपण काही सोप्या उपाययोजना करू शकतो. घराच्या गॅलरीत किंवा अंगणात चिमण्यांसाठी बाराही महिने मातीचे पसरट पाण्याचे भांडे ठेवावे. दर आठवड्याला या भांड्यामधील शेवाळ व कचरा काढून ते स्वच्छ करावे. अंगणातील इंच-इंच जागेचे कॉंक्रीटीकरण करू नये; काही भागांत माती ठेवावी, जेणेकरून चिमणी त्यामध्ये धूळ अंघोळ करू शकेल. घराच्या अंगणात, गॅलरीत, व्हरांड्यात, वॉशिंग स्पेसवरील छपरावर किंवा सोलर पॅनलच्या खालील अँगलवर चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी लावावीत. घरातील जुने सुतळीचे पोते फाडून त्याचे तुकडे करावेत व त्यातील सुतळी थोडी विरळ करून ती एखाद्या ठिकाणी लटकवून ठेवावी, जेणेकरून तिला घरट्यासाठी साहित्य मिळेल. घराच्या परिसरात बकुळ, तगर, जांभूळ किंवा योगनवेल लावावीत. चिमण्या फांद्या दाट असलेल्या झाडांमध्ये जारत आढळतात. या गोष्टी केल्यास चिमण्यांना सुरक्षित वातावरण मिळू शकते.

आज मोबाइलवर चिमणी संवर्धनाचे अनेक उपाय सांगितलेले आहेत: आता गरज आहे ती फक्त कृती करण्याची.

भविष्यात जर नवीन पिढीला समृद्ध जीवन जगण्यासाठी स्वच्छ हवा व पाणी द्यायचे असेल, तर आज पुन्हा चिमणीला आपल्या अंगणात आणावे लागेल; कारण त्याच चिऊताईच्या माध्यमातून नवीन पिढीची नाळ निसर्गाशी जुळवता येते आणि त्यांच्या मनांमध्ये निसर्गसंवर्धनाच्या संस्कारांचे बीज रुजवता येते. मोबाइलमध्ये मान खाली घालून नाही, तर ताठ मानेने जगण्याचा मार्ग फक्त चिऊताईच दाखवू शकते. तेव्हा या 'चिमणी दिना'ला चिमणी संवर्धनाची कृती करा आणि आपल्या पाल्यांचे भविष्य समृद्ध करा... नाहीतर चिमणीही भुर्रकन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही....

**अमोल सावंत**
**निसर्ग कट्टा तथा कार्यकारिणी सदस्य,**
**महाराष्ट्र पक्षिमित्र**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जेजुरी गडावर गुढीपाडव्याचा जल्लोष; खंडोबा देवाची महापूजा आणि गडावर आकर्षक फुलांची सजावट

दैनिक आपला विदर्भ

**जेजुरी/प्रतिनिधी :** आज चैत्र शुद्ध प्रतिपदा, हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर भक्तिमय वातावरणात सण साजरा करण्यात आला. पहाटेच्या मंगल समयी खंडोबा देवाची पारंपरिक पद्धतीने महापूजा संपन्न झाली. त्यानंतर मुख्य गाभाऱ्याची विशेष पाखळणी करण्यात आली.






गुढीपाडव्याच्या निमित्ताने श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने मुख्य गाभारा आणि मंदिर परिसरात विविध प्रकारच्या सुगंधी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर सुशोभित आणि प्रसन्न दिसत होता. नववर्षाच्या पहिल्या दिवशी देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गडावर मोठी गर्दी केली होती. परंपरेनुसार, खंडेरायाची मानाची गुढी देवसंस्थानच्या माननीय विश्वस्त मंडळाच्या हस्ते उत्साहात उभारण्यात आली.

यावेळी देवसंस्थानचे अध्यक्ष मंगेश घोणे तसेच देवसंस्थानचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषात नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले.

## जालन्यातील मंठा तालुक्यात पावसाचा जोर; वझर-सरकटे परिसरात गारांचा पाऊस



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यात आज मुसळधार पावसाने हजेरी लावली. हवामान विभागाने दिलेल्या येलो अलर्टनुसार जिल्ह्यात ठिकठिकाणी पाऊस पडत असून तळणी मंडळात जोरदार सरी कोसळल्या. तर वझर-सरकटे गाव परिसरात गारपीटही झाली आहे.

या अवकाळी पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला तरी काढणीला आलेल्या रब्बी पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे रब्बी हंगामातील पिकांना फटका बसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## केवळ धनंजय मुंडेला बदनाम करण्यासाठी प्रयत्न करत होते - धनंजय मुंडे



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** नगरपालिका निवडणुकांच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापलेले असताना, मी मात्र पूर्णपणे वेगळ्याच परिस्थितीत होतो. राज्यभरातील अनेक मोठे नेते एकत्र येऊन केवळ धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत होते.

त्या सगळ्या घडामोडी पाहता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, आपल्यात काहीतरी ताकद आहे, म्हणूनच एवढ्या मोठ्या पातळीवर आपल्याला संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. कदाचित त्यांना वाटत असावं की हे व्यक्तिमत्व आपल्यावर भारी पडेल.

सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया आणि युट्युब चॅनल्सवर सतत नकारात्मक वातावरण तयार करण्यात आलं. तरीही या सर्व दबावाला न जुमानता परळीच्या मायबाप जनतेने महायुतीच्या पाठीशी भक्कमपणे उभं राहत ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

# अल्पवयीन बलात्कार पीडितेला दिलासा : गुजरात उच्च न्यायालयानं १६ आठवड्यांचा गर्भपात करण्यास दिली मंजुरी

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** गांधीनगर इथल्या १६ वर्षीय बलात्कार पीडितेला गुजरात उच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिला आहे. या बलात्कार पीडितेला १६ आठवड्यांचा गर्भपात करण्यास उच्च न्यायालयानं मंजुरी दिली आहे. या प्रकरणात, सदर अल्पवयीन पीडितेनं गर्भधारणा पुढं चालू ठेवणं आपल्याला शक्य नसल्याचं सांगत न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान, उच्च न्यायालयानं त्वरित पावलं उचलली आणि गांधीनगर येथील सरकारी रुग्णालयाला सदर अल्पवयीन मुलीची सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश दिले. डॉक्टरांच्या एका पथकानं ही तपासणी केली आणि गर्भपातासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं नमूद करणारा अहवाल सादर केला. या अहवालाच्या आधारे, न्यायालयानं गर्भपातास मंजुरी दिली आहे.

अल्पवयीन मुलीवर बलात्कार : या प्रकरणात, डिसेंबर २०२५ मध्ये दाभोडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असला तरी, गर्भपातास मंजुरी देतानाच उच्च न्यायालयानं डॉक्टरांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले. त्यानुसार, गर्भातून प्राप्त झालेला डीएनए () नमुना जतन करून तो तपास अधिकाऱ्याकडं सुपूर्द करावा, जेणेकरून त्याचा वापर पुरावा म्हणून करता येईल.आपल्या आदेशात, न्यायालयानं सदर अल्पवयीन मुलीच्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याला सर्वोच्च प्राधान्य दिलं. समाजात होणारा संभाव्य परिणाम आणि सदर मुलीचं भविष्य या बाबी लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आल्याचंही न्यायालयानं नमूद केलं. अशा परिस्थितींमध्ये, पीडितेची इच्छा आणि तिचं कल्याण यालाच सर्वोच्च महत्त्व असते, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

न्यायालयानं पीडितेची मानसिक स्थिती आणि भविष्याचा केला विचार : ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी अनुभवी आणि ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञांचा समावेश असलेलं डॉक्टरांचं विशेष पथक गठीत केलं जाईल. गर्भपात करण्यापूर्वी, सदर अल्पवयीन मुलीला या प्रक्रियेशी संबंधित सर्व संभाव्य धोक्यांची सविस्तर माहिती दिली जाईल. त्यानंतरच तिची संमती घेतली जाईल. गर्भपाताच्या प्रक्रियेदरम्यान जर अर्भक जिवंत जन्माला आलं, तर त्या अल्पवयीन मुलीला आणि नवजात अर्भकाला योग्य ती वैद्यकीय सेवा आणि संरक्षण पुरवण्यात यावे, असे निर्देश न्यायालयानं दिले. जर सदर अल्पवयीन मुलीनं त्या अर्भकाचा ताबा स्वतःकडं न ठेवण्याचा निर्णय घेतला, तर त्यानंतरची पुढील कार्यवाही किशोर न्याय अधिनियमातील तरतुदींनुसार केली जाईल. याचिकाकर्त्यांचे वकील, ॲड. पी व्ही पटालिया म्हणाले, ''या प्रकरणात, न्यायालयानं पीडितेची मानसिक स्थिती आणि तिचं भविष्य या बाबींचा विचार करून एक संवेदनशील आणि यथायोग्य निकाल दिला आहे. कायदा म्हणजे केवळ नियमांचा संच नव्हे, तर तो माणुसकीशीही खोलवर जोडलेला आहे. हा निकाल त्याचंच एक उत्तम उदाहरण आहे.'' त्यांनी पुढं असंही नमूद केले की, अशा प्रकारचा निकाल इतर तत्सम प्रकरणांमध्ये एक मार्गदर्शक दृष्टांत म्हणून उपयुक्त ठरू शकतो. विशेषतः अशा प्रकरणांमध्ये, जिथं पीडितांना त्वरित आणि संवेदनशील न्याय मिळवून देणं अत्यंत आवश्यक असते.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये गुढीपाडवा सण उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान, संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये नववर्ष तथा गुढीपाडवा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेच्या शिक्षिका रुपाली कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील गुढीपाडव्याचे विशेष महत्व याविषयी विस्तृत माहिती दिली. विशेषकरून महाराष्ट्रात नववर्ष हा गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो तसेच याच दिवशी प्रभू रामचंद्रांनी वनवास संपवून रामराज्य स्थापन केले व आयोध्या नगरीत प्रवेश केला आणि त्या दिवशी येथील लोकांनी आपल्या घरावर गुढ्या उभारुन, घराच्या दारांना तोरणं बांधून प्रभू रामचंद्रांचे स्वागत केले होते. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे यांनी गुढीची पूजा केली. सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुढीपाडव्याच्या व मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई-गोवा महामार्गावर चरवेली येथे भीषण अपघात; टँकर पलटी

**मुंबई/प्रतिनिधी :** गोव्याकडून येणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या टँकरने एलपीजी टँकरला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. धडकेनंतर टँकर पलटी झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशामक दल आणि रत्नागिरी पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून गोव्याकडून येणारी वाहतूक सध्या बंद ठेवण्यात आली आहे. सुदैवाने अद्याप जीवितहानीची माहिती समोर आलेली नाही.






# शब्दकोडे क्र. 85

आडवे शब्द

१. रात्रीच्या रात्री ४. फोटो ६. राष्ट्रगीताची सुरुवात ११. शंभर पैसे १३. बाजेची कापडी पट्टी १४. सोन्याचा धागा १५. वाईट १७. हमाल १९. निबर, एक इंग्रजी महिना २१. अडत्या २३. खर्चच्या विरूद्ध २५. पोवाडे म्हणणारा २७. फांदी तुटतानाचा आवाज २९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव ३१. रोख ३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ ३४. मालक ३५. हे जसे-फळ तसेच! ३६. पाळता येईल असा प्राणी ३८. कोष्टी, कापड विणणारा ४०. दिल्लीचे विमानतळ ४२. छोटा, लहान ४३. सैन्य ४४. कवडीमोल ४६. शहर ४८. मुलगा, पुत्र ५१. जुळे ५२. उगीच ५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी ५६. शेतकरी (हिंदी) ५८. गाजावाजा ५१. पळून जाणे ६०. मोठी गंमत ६१. रंग बदलणारे फूल ६२. नम्र, वाकलेला ६४. एक आंबट-गोड फळ ६५. खूप ६६. चालू दिवस ६७. ओघ, पाण्याचे वाहणे ६९. थडगे ७१. फटाक्याची माळ ७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली ७४. मृत्यूदेवता ७५. जनक राजाची मुलगी ७८. झडती (हिंदी) ७९. एकूण एक, सर्व ८०. फेटाळणे ८१. लक्ष्मी

उभे शब्द

१. अडखळत बोलणारा ३. झाड, वृक्ष ४. सावली ५. पुष्कळ ६. आई-वडील ७. नवीन ८. नडलेला अडलेला ९. मला १०. श्रेष्ठ पुरुष १२. पैंजण १५. पाषण १६. पाणकोंबडा १७. हिंदुस्थान १८. राबता, ये-जा २०. धुंदी, कैफ २२. आवडता, प्रिय २४. कापड विणण्याचे साधन २६. साठावा वाढदिवस २८. कोवळी फांदी २९. चाळीस शेर ३०. पोते शिवण्याची सुई ३३. जाड दोर ३४. पृथ्वी ३६. हालचालीवर ठेवलेली नजर ३७. वर्तुळ ३८. गणपती ३९. कमीत कमी व जास्तीत जास्त ४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी ४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा ४५. श्रीकृष्णाचे एक नाव ४७. रविवार ४९. दृष्टीभेट ५०. प्रकाश, कांती ५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी ५४. देवाण-घेवाण ५५. रेलण्याची उशी ५७. प्रामाणिक ६०. श्रीमंत ६१. दाहक आम्ल (हिंदी) ६३. ग्रामीण बोलीत तेव्हा ६५. लाभदायक ६६. आजूबाजूला ६८. अंकित माणूस, हेर ६९. लावणीतील पास असे असते! ७०. प्रजा ७३. मांडणी ७४अ. मज ७५. एक मिश्र धातू ७६. ओटा, पार ७७. न्यायाने वागणारा



## शब्दकोडे क्र. 84 चे उत्तर

आडवे उत्तर


१.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७९.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

उभे उत्तर

१.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम

वृत्तविशेष...


## डोणगावमध्ये मंदिरावर वीज कोसळली; सुदैवाने मोठी दुर्घटना टळली





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील डोणगाव येथे आज सकाळी अवकाळी पावसासह झालेल्या विजांच्या कडकडाटामुळे भीतीदायक घटना घडली. आरेगाव रोडवरील वार्ड क्रमांक २ मधील खंडोबा मंदिरावर अचानक वीज कोसळल्याने मंदिराचा काही भाग नुकसानग्रस्त झाला आहे. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास परिसरात जोरदार वारे, पाऊस आणि विजांचा कडकडाट सुरू होता. याच दरम्यान अचानक वीज मंदिरावर कोसळली. त्या वेळी मंदिरात एक महिला पूजा करत होती. वीज कोसळल्याचा मोठा आवाज आणि धक्क्यामुळे काही क्षण परिसरात घबराट निर्माण झाली. मात्र सुदैवाने संबंधित महिलेचा थोडक्यात बचाव झाला. या घटनेत मंदिराच्या छताचा व भिंतींचा काही भाग तडकला असून किरकोळ नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी मंदिराकडे धाव घेतली आणि परिस्थितीची पाहणी केली. काही वेळासाठी परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. दरम्यान, या घटनेमुळे डोणगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अवकाळी पाऊस आणि विजांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## शेगावात झाडावर वीज कोसळली; झाड जळून खाक, जीवितहानी टळली



**शेगाव/प्रतिनिधी :** राज्यात अवकाळी हवामानाचा प्रभाव वाढताना दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरात वीज कोसळण्याची घटना घडली आहे. बुधवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची हजेरी लागली असताना विजांचा कडकडाट सुरू होता. याच दरम्यान शेगाव शहरातील वेंकटेश नगर, ताडी परिसरातील एका उंच ताडाच्या झाडावर अचानक वीज कोसळली. वीज पडताच झाडाने पेट घेतला आणि काही वेळातच संपूर्ण झाड जळून खाक झाले. मोठा आवाज झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

## चिखली तालुक्यात निसर्गाचा कोप; पिके आणि फळबागांचे नुकसान

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील चिखली तालुक्यात आज दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. हरभऱ्याच्या दाण्याएवढ्या गारांनी शेतात उभ्या असलेल्या पिकांना तडाखा दिला. या गारपिटीमुळे कांदा, गहू, हरभरा यांसह आंबा आणि इतर फळबागांचे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. अनेक शेतांमध्ये पिके आडवी पडल्याचे चित्र दिसून येत असून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. काल रात्री शेगाव तालुक्यातही वादळी वाऱ्यासह हलका पाऊस झाला होता. मात्र आज चिखली तालुक्यात झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# रमजान ईद पार्श्वभूमीवर मेहकर पोलिसांचा रूट मार्च

## शांतता व ऐक्य राखण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरात रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासन सतर्क झाले असून पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार यांनी नागरिकांना शांतता व ऐक्य राखण्याचे आवाहन केले आहे. ''हिंदू-मुस्लिम बांधवांनी परस्परांना शुभेच्छा देत सण आनंदात व उत्साहात साजरे करावेत,'' असे त्यांनी सांगितले.

या अनुषंगाने १९ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता शहरातील संवेदनशील मिश्र वस्त्यांतून पोलिसांकडून फ्लॅग मार्च काढण्यात आला. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली हा मार्च पार पडला. अशोक वाटिका चौक, तहसील चौक, इमामवाडा चौक, मरी माता चौक, बालाजी चौक आणि मस्तान चौक या प्रमुख मार्गांवरून मार्च काढण्यात आला. या फ्लॅग मार्चमध्ये पोलीस स्टेशन मेहकरचे ४ अधिकारी व २५ अंमलदार तसेच एसआरपीएफचे १ अधिकारी व २४ अंमलदार सहभागी झाले होते. संबंधित मार्गांची माहिती एसआरपीएफ पथकाला देण्यात आली.





यावेळी पोलीस निरीक्षक आलेवार यांनी सांगितले की, मेहकर शहरात सर्व धर्मीय सण उत्साहात साजरे करण्याची परंपरा असून नागरिकांमध्ये ऐक्य व बंधुत्व टिकून आहे. रमजान ईदही त्याच वातावरणात साजरी व्हावी, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन २४ तास तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# युद्धजन्य परिस्थितीचा फटका संत भोजाजी महाराज देवस्थानालाही

## प्रसाद बनवण्यासाठी करावा लागतोय चुलीचा वापर



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी** :वर्धा जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या संत भोजाजी महाराज देवस्थान आजनसरा येथील मंदिराला युद्धजन्य परिस्थितीचा फटका बसला आहे व्यवसायिक सिलेंडर मिळत नसल्याने भक्तासाठी बनवण्यात येणारा महाप्रसाद हा चुलीवर बनवण्याची वेळ मंदिर प्रशासनावर आली आहे. मोठ्या अडचणींचा सामना करत चुलीवर अन्न शिजवावे लागत आहे.

येथे विदर्भातून नव्हे तर महाराष्ट्रातूनच दुर दुरून भाविक येतात आणि त्यांच्या प्रसादाची सोय ही सध्या चुलीवर प्रसाद बनवून करावी लागत आहे. प्रसादालय हे वरच्या मजल्यावर असून खालून चुलीवर अन्न शिजवून वर न्यावे लागत आहे लवकरात लवकर सिलेंडरची उपलब्धता करून द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे

# ६८ लाखांचं बक्षीस असलेल्या ११ नक्षलवाद्यांनी टाकली शस्त्रं

## गडचिरोली पोलिसांचं मोठं यश

दैनिक आपला विदर्भ

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेला मोठं यश मिळालं असून ११ वरिष्ठ नक्षलवाद्यांनी पोलीस आणि सीआरपीएफसमोर आत्मसमर्पण केलं आहे. आत्मसमर्पित नक्षलवाद्यांमध्ये डिव्हीसीएम, एरिया कमिटी सचिव, पीपीसीएम, कमांडर व एसीएम पदावरील नेत्यांचा समावेश असून शासनानं त्यांच्यावर एकूण ६८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

या नक्षलवाद्यांनी केलं आत्मसमर्पण : आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये सोनी उर्फ बाली मट्टामी (डिव्हीसीएम), बुदरी उर्फ रामबत्ती मट्टामी (एरिया कमिटी सचिव), सुखलाल कोक्सा (कमांडर), शांती उर्फ सोमरी तेलामी (पीपीसीएम), यमुनक्का पोट्टी पेंदाम (एसीएम) यांच्यासह इतर सहा सदस्यांचा समावेश आहे. हे सर्व नक्षलवादी गडचिरोली आणि छत्तीसगड सीमावर्ती भागात सक्रिय होते. गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी चळवळ आता जवळपास संपुष्टात येत असून पूर्वी १० उपविभागांत सक्रिय असलेली चळवळ सध्या




भामरागडच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. शासनाच्या आत्मसमर्पण धोरणामुळं आणि पोलीस-सीआरपीएफच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळं अनेक नक्षलवादी मुख्य प्रवाहात येत आहेत.

नक्षलवादी मोहिमेला मोठं यश : सन २०२५ पासून आतापर्यंत १२३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. आजपर्यंत एकूण ७९४ नक्षलवादी पोलीस दलासमोर शरण आले आहेत. विशेष म्हणजे ऑक्टोबर २०२५ मध्ये वरिष्ठ नक्षलवादी नेता भूपती उर्फ सोनू याच्यासह ६१ नक्षलवाद्यांनी शस्त्रांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं होतं. त्यामुळं नक्षलवादी चळवळीला मोठा धक्का बसला होता. पोलीस प्रशासनानं आत्मसमर्पित नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनावर भर दिला असून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी चळवळ आता पूर्णपणे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. भूपतीच्या आत्मसमर्पणानंतर देशभरातील एकूण ८९७ नक्षलवाद्यांनी ५४५ शस्त्रांसह शस्त्रं खाली ठेवली आहेत. या कारवाईमुळं नक्षलविरोधी मोहिमेला मोठं यश मिळाल्याचं मानलं जात आहे.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा होता. आता पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. तसेच अर्जाचे नमुने https://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

## साहेबराव करपे स्मृतिदिनानिमित्त

# यवतमाळात सामूहिक अन्नत्याग आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** पहिल्या शेतकरी आत्महत्येचे प्रतीक ठरलेले स्व. साहेबराव पाटील करपे (रा. चिलगव्हाण, ता. महागाव) यांच्या स्मृतिदिनानिमित्त शहरातील आझाद मैदान येथे सामूहिक अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. शेतकरी चळवळ, यवतमाळ व यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.शेतकऱ्यांच्या वेदना, अन्याय व संघर्षाची ज्वलंत आठवण समाजासमोर ठेवण्यासाठी तसेच शासनाने शेतकरी प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घ्यावी, या उद्देशाने आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात स्व. साहेबराव करपे पाटील व त्यांच्या पत्नी मालतीताई करपे पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. या वेळी उपस्थितांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

